॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻
माणूस परिस्थितीचा गुलाम असतो.

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३४१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### आप'बिती

बोलाचाच भात आहे
अन बोलाचीच कढी
आप'लाच हात सोडून
सत्तेत निघालाय गडी
विरोधकांना करायचेय
झाडू'न सारे साफ
या छत्राखाली होतात
सगळेच गुन्हे माफ

## SPOT NEWS

### राघव चड्ढांचे पक्षांतर, १० लाख फॉलोअर्स गमावले


● **नवी दिल्ली** – आम आदमी पार्टी (आप) सोडून भाजपमध्ये प्रवेश करण्याचा राघव चड्ढा यांचा निर्णय तरुणांना फारसा रुचलेला दिसत नाही. तरुणाईत प्रचंड लोकप्रियता असलेले राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी भाजप प्रवेशाच्या अवघ्या २४ तासांत १० लाख फॉलोअर्स गमावले आहेत. राघव चड्ढा यांनी 'आप'ला सोडचिठ्ठी देऊन भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे दिल्लीच्या राजकारणात मोठी खळबळ माजली आहे. भाजप प्रवेशानंतर २४ तासांच्या आत चड्ढा यांच्या इन्स्टाग्राम फॉलोअर्समध्ये १० लाखांची घट झाली आहे. शुक्रवारी राघव चड्ढा यांचे १४.६ दशलक्ष (१ कोटी ४६ लाख) फॉलोअर्स होते, जे शनिवारी दुपारी १ वाजेपर्यंत १३.५ दशलक्ष वर आले आहेत.

# वॉशिंग्टनच्या हॉटेलमध्ये गोळीबार

## डिनरसाठी आलेले राष्ट्राध्यक्ष ट्रम्प थोडक्यात बचावले । सीक्रेट सर्विसने सुरक्षित बाहेर काढले

● **वॉशिंग्टन** – अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन येथील 'वॉशिंग्टन हिल्टन' हॉटेलमध्ये शनिवारी रात्री एका कार्यक्रमादरम्यान गोळीबाराची खळबळजनक घटना घडली. या हॉटेलमध्ये आयोजित 'व्हाइट हाऊस करस्पॉन्डंट्स डिनर'साठी (WHCA) राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उपस्थित होते. गोळीबाराचा आवाज ऐकताच सीक्रेट सर्विसच्या एजंट्सनी तत्काळ ट्रम्प यांना सुरक्षित स्थळी हलवले. या घटनेत ट्रम्प पूर्णपणे सुरक्षित असून एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे.

शनिवारी रात्री ८:४० च्या सुमारास, जेव्हा हॉटेलच्या मुख्य बॉलरूममध्ये शेकडो पत्रकार, नेते आणि सेलिब्रिटी रात्रीच्या जेवणासाठी जमले होते, तेव्हा हॉटेलच्या सिक्युरिटी स्क्रीनिंग एरियाजवळ अचानक गोळीबाराचे आवाज ऐकू आले. सीएनएनचे पत्रकार वोल्फ ब्लिट्झर यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी प्रत्यक्ष बंदूकधारी व्यक्तीला गोळ्या झाडताना पाहिले. गोळीबार सुरू होताच हॉलमध्ये प्रचंड गोंधळ उडाला आणि उपस्थितांनी टेबलांखाली लपून स्वतःचा बचाव केला.



गोळीबाराचे पहिले काही आवाज येताच मंचावर बसलेल्या डोनाल्ड ट्रम्प आणि प्रथम महिला मेलानिया ट्रम्प यांच्याकडे सीक्रेट सर्विसचे एजंट धावून गेले. त्यांनी तात्काळ मानवी कडा करून ट्रम्प दाम्पत्याला जमिनीकडे झुकवले आणि काही सेकंदातच त्यांना सुरक्षित बाहेर काढले. या घटनेत ट्रम्प यांच्यासोबतच उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. वन्स आणि इतर कॅबिनेट मंत्र्यांनाही सुरक्षितपणे हॉटेलमधील सुरक्षित खोल्यांमध्ये नेण्यात आले.

सीक्रेट सर्विसने दिलेल्या माहितीनुसार, कॅलिफोर्नियातील एका ३० वर्षीय तरुणाला या प्रकरणी ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेत एक सुरक्षा रक्षक जखमी झाला आहे. बुलेटप्रूफ जॅकेट घातलेले असल्याने त्याचा जीव वाचला असून त्याची प्रकृती स्थिर आहे. हल्लेखोराजवळून घातक शस्त्र जप्त करण्यात आले असून एफबीआय या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे.

या गोळीबारामुळे प्रतिष्ठित मानला जाणारा 'व्हाइट हाऊस करस्पॉन्डंट्स डिनर' रद्द करावा लागला. २०१७ नंतर ट्रम्प प्रथमच या कार्यक्रमाला उपस्थित राहणार होते, मात्र सुरक्षेच्या कारणास्तव हा कार्यक्रम स्थगित करण्यात आला आहे. पुढील ३० दिवसांत हा कार्यक्रम पुन्हा आयोजित केला जाण्याची शक्यता आहे.

> वॉशिंग्टनमध्ये आजची रात्र खरोखरच धक्कादायक होती. सीक्रेट सर्विस आणि कायदा अंमलबजावणी संस्थांनी अत्यंत धाडसाने आणि वेगाने काम केले. त्यांच्या तत्परतेमुळे मोठे संकट टळले. मी सुरक्षित असून हल्लेखोराला पकडण्यात आले आहे.
>
> **– डोनाल्ड ट्रम्प**

## पक्ष टिकवण्यासाठी कायदा होणे गरजेचे : अण्णा हजारे

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – आम आदमी पक्षातून राज्यसभेचे खासदार राघव चड्ढा यांनी इतर ६ राज्यसभा खासदारांसह भाजपमध्ये पक्षप्रवेश करणार असल्याची घोषणा केली. या घटनेची देशाच्या राजकारणात चांगलीच चर्चा होत आहे. अशामध्ये आता या घडामोडींवरून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. अशामध्ये आता समाजसेवक अण्णा हजारे यांनीदेखील आपली प्रतिक्रिया दिली आहे. 'पक्ष टिकवण्यासाठी कायदा होणे गरजेचे आहे. आपल्या मर्जीप्रमाणे कोणीही पक्ष बदलणार नाही.' असे म्हणत घडलेल्या घटनेबद्दल संताप व्यक्त केला आहे.

राजकीय पक्षांतर हे चीड आणणारे असल्याचे समाजसेवक अण्णा हजारे यावेळी म्हणाले आहेत. ''पक्ष आणि पार्टी टिकण्यासाठी एकत्र राहण्यासाठी संसदेत कायदा होणे गरजेचे आहे. सत्ता आणि पैसा यांच्या लालसेमध्ये येताच इकडून तिकडे आणि तिकडून इकडे पक्षांतर होते. त्यामुळे, मनमर्जीप्रमाणे सत्ताबदलाचे काम होते हे बरोबर नाही. 'स्वार्थ संपल्यानंतर लोक सोडून जातात, समाज आणि देश डोळ्यांसमोर ठेवून काम केल्यास कोणीही जाणार नाही. आज समाज आणि देशाला विसरून नेते सत्ता आणि पैशाच्या पाठीमागे लागत आहेत. हे जे सुरू आहे ते स्वार्थासाठी सुरू आहे. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता, आज समाज आणि देश डोळ्यासमोर राहिला नाही, असे ते यावेळी म्हणाले.

## बाळूमामांचा अवतार भासवणाऱ्या मनोहर भोसलेविरुध्द गुन्हा दाखल

● **सोलापूर । वीरभूमी** – काळी जादू, लैंगिक शोषणासह फसवणुकीचे गंभीर गुन्हे असलेल्या भोंदू मनोहर मामा भोसले याला चौकशीसाठी कुर्डुवाडी पोलिस ठाण्याच्या पथकाने शुक्रवारी (२४ एप्रिल) दुपारी पुण्यात मांजरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून पुन्हा अटक केली आहे.

मनोहर भोसले याने बांधकाम व्यापारी गौतम कसबे (रा. सोलापूर) यांना धंद्यात प्रगती करण्यासाठी दोन लाख रुपयांची मागणी केली. त्यातील ५० हजार रुपये स्वीकारून आपली फसवणूक केल्याची तक्रार पोलिसांकडे प्राप्त झाली.

# त्र्यंबकेश्वर व चौंडी येथून 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा शुभारंभ

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते कुशावर्त येथे जलपूजन



● **नाशिक । वीरभूमी** – राज्यातील जलव्यवस्थापन अधिक प्रभावी, लोकाभिमुख व शाश्वत करण्याच्या उद्देशाने आयोजित 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६' च्या शुभारंभ प्रसंगी त्र्यंबकेश्वर येथे जलदिंडीचे आयोजन करण्यात आले. ढोल, टाळ, मृदूंगाच्या गजरात आणि पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडवीत उत्साहाने जलजागृतीचा संदेश देण्यात आला.

गोदावरी नदीचे उगमस्थान असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त तीर्थावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते सपत्नीक जलपूजन करून शहरातून जलदिंडी काढण्यात आली. याप्रसंगी जुना आखाड्याचे महंत हरिसिंग महाराज तसेच आनंद आखाड्याचे अध्यक्ष भगवान बाबा उपस्थित होते. त्यानंतर मंत्री श्री. विखे पाटील यांच्या उपस्थितीत जलयात्रेची पालखी टाळ-मृदुंग व ढोल-ताशांच्या गजरात शहरातून मार्गस्थ झाली.

या प्रसंगी आमदार हिरामण खोसकर, आमदार गोपीचंद पडळकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने आदी उपस्थित होते.

त्र्यंबकेश्वर शहरातून प्रारंभ झालेल्या या जलदिंडीचा श्री स्वामी समर्थ गुरूपीठ येथे उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. जलसंवर्धनाचा व्यापक संदेश समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचवून लोकसहभागातून पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, राहुल पाटील, नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, कार्यकारी अभियंता वैभव भागवत (पालखेड), लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता नीलेश पाटील, तहसीलदार गणेश जाधव, त्र्यंबकेश्वर नगर परिषदेचे मुख्याधिकारी गोविंद जाधव, आचार्य तुषार भोसले यांच्यासह नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील पुरोहित संघाचे पदाधिकारी आणि नागरिक, महिला मोठ्या संख्येने या जलदिडींत सहभागी झाल्या.

## 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा जलसंवर्धनाचा नवा संदेश देईल : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – श्री क्षेत्र चौंडी ही मराठी संस्कृतीचे माहेरघर असून गेल्या ३०० वर्षांपासून ही भूमी राज्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. 'गोदा ते नर्मदा' यात्रेचा प्रवास केवळ भौगोलिक नसून तो आध्यात्मिक व सांस्कृतिक आहे. आपल्या इतिहासाचा, संस्कृतीचा व लोकभावनेचा सन्मान करत ही यात्रा राज्यातच नव्हे तर देशभर जलसंवर्धनाचा नवा संदेश देईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. पाण्याचे महत्त्व पटवून देत पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचे कार्य या यात्रेतून होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जामखेड तालुक्यातील श्रीक्षेत्र चौंडी येथे आयोजित 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६' या जलजागृती यात्रेच्या शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खा. रामराव वडकुते, आ. काशिनाथ दाते, आ. विठ्ठल लंघे, आ. अमोल खताळ, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे, अधीक्षक अभियंता अलका अहिरराव, प्रवीण कोल्हे, देविदास महाराज, पुंडलिक महाराज जंगले शास्त्री, डॉ. विकासानंद महाराज मिसाळ, आदिनाथ महाराज शास्त्री, राम महाराज झिंझुर्के, दयानंद महाराज कोरगावकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अशी असेल यात्रा

■ दि. २५ एप्रिल २०२६ रोजी त्र्यंबकेश्वर येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गोदावरीच्या उगमस्थानातून जलकलश घेऊन यात्रेला प्रारंभ होणार आहे. ही यात्रा नाशिक, सिन्नर मार्गे संगमनेर येथे पहिला मुक्काम करेल. त्यानंतर लोणी मार्गे शिर्डी येथे पोहोचेल. चौंडी येथून निघालेली यात्रा अहिल्यानगर येथे पहिला व शिर्डी येथे दुसरा मुक्काम करेल. तिसऱ्या दिवशी दोन्ही यात्रा एकत्र येऊन संभाजीनगरमार्गे घृष्णेश्वर येथे मुक्कामी राहतील. चौथ्या दिवशी कन्नड-चाळीसगाव मार्गे धुळे येथे मुक्काम होईल. तर दि. २९ एप्रिल २०२६ रोजी महेश्वर येथे पोहोचून मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जलकलश स्वीकारल्यानंतर यात्रेचा समारोप होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची ज्योत पेटवली, तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यातून स्वराज्याचा विस्तार केला. सुशासन, महिला सक्षमीकरण, लोककल्याण, जलदृष्टी, वारसा संवर्धन आणि राष्ट्रनिर्मिती ही त्यांच्या राज्यकारभाराची वैशिष्ट्ये होती. २९ वर्षांच्या आदर्श शासनातून लोककल्याणकारी राज्य म्हणजे काय, हे त्यांनी जगाला दाखवून दिले. अहिल्यादेवी होळकर यांनी जलसंवर्धन, धर्मशाळांची उभारणी, मंदिरांचे जीर्णोद्धार, नद्यांवर घाटांची निर्मिती, आदर्श करव्यवस्था तसेच शेतकरी आणि व्यापाऱ्यांना सवलती देऊन समाजहिताचे कार्य केले. त्या काळात महिला सक्षमीकरणालाही त्यांनी चालना दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित होते. 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६' ही त्यांच्या कार्याला उजाळा देणारी असून या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा संकल्प आहे. जन्मभूमी ते कर्मभूमी या संकल्पनेतून चौंडी येथून निघालेली ही यात्रा जनतेमध्ये जलसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करेल, असे त्यांनी सांगितले.

'जलयुक्त शिवार' अभियानातून सुमारे २२ हजार गावांमध्ये साडेसहा लाख कामे करून अनेक भाग टंचाईमुक्त करण्यात यश आले आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर 'एल निनो'सारखी आव्हाने समोर येत असल्याने पाण्याचा काटकसरीने वापर आणि वृक्ष संवर्धन आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

SPOT NEWS

## पाथर्डीचे सुपुत्र महेश भागवत बनले तेलंगणाचे पोलिस महासंचालक

● **पाथर्डी । वीरभूमी-**



पाथर्डी शहराचे सुपुत्र व तेलंगणा राज्यातील वरिष्ठ आयपीएस अधिकारी महेश भागवत यांची तेलंगणा राज्यात पोलीस महासंचालक (कायदा आणि सुव्यवस्था) पदी निवड झाली आहे. पोलीस महासंचालक पदावर नियुक्ती झालेले ते अहिल्यानगर जिल्ह्यातील दुसरे अधिकारी आहेत. भागवत यांच्या नियुक्तीने अहिल्या नगरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. ही निवड अहिल्यानगर जिल्ह्यासह पाथर्डी तालुक्यातील सर्व नागरिकांसाठी अभिमानास्पद आहे. तर अनेकांना प्रेरणा देणारी आहे. सध्या ते तेलंगणा राज्यात कायदा व सुव्यवस्था विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक या पदावर कार्यरत होते. त्यापूर्वी काही वर्षे हैद्राबादच्या शिवार प्रांतातील राचकोंडा पोलीस आयुक्तांलयाचे प्रथम पोलीस आयुक्त म्हणूनही कार्यरत होते. भागवत यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण पाथर्डी येथे तर पुढील शिक्षण पुणे येथे झाले आहे. त्यांनी नक्षलवाद्याच्या विरोधात कारवाई केली तर व्हाईट कॉलर गुन्हेगारी नियंत्रणात आणणे, संघटित अंमली पदार्थ विक्रेत्यांवर कारवाई करणे, मानवी तस्करीला आळा घालणे, पीडितांना लैंगिक तस्करीच्या जाळ्यात अडकून न देणे, राज्य, देश व परदेशात तस्करांवर खटला चालवणे अशा मोहिमेत सहभाग घेतला आहे. आपल्या पदाचा त्यांनी गुरुवारी (ता.२३) पदभार घेतला असून, त्यांच्या या निवडीचे अहिल्यानगर जिल्ह्यासह सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## सन फार्मा विद्यालयात आरएसपी विद्यार्थ्यांना अग्निशमनाचे प्रशिक्षण

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

महाराष्ट्र राज्य पोलीस गृह विभाग आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक सुरक्षा आणि नागरी संरक्षण या विषयांतर्गत नागापूर येथील सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आर.एस.पी. (राष्ट्र विद्यार्थी पोलिस) विद्यार्थ्यांसाठी विशेष अग्निशमन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आग विझविण्याचे प्रत्यक्ष धडे देत आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. आजच्या धकाधकीच्या जीवनात वाढते तापमान आणि बदलते वातावरण यामुळे विविध प्रकारच्या आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सध्या ३८ ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचणाऱ्या तापमानामुळे इलेक्ट्रिक वाहनांना आग लागणे, माळरान व डोंगर पेट घेणे, घरगुती विजेच्या शॉर्टसर्किटमुळे किंवा गॅस गळतीमुळे लागणाऱ्या आगी अशा घटना वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आग लागल्यास योग्य उपाययोजना करून ती कशी नियंत्रणात आणावी याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. महानगरपालिका अग्निशामक दलाचे अधिकारी शंकर मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशामक बंबाच्या साहाय्याने विविध प्रकारच्या आगी विझविण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच विजेचे शॉर्टसर्किट झाल्यास घ्यावयाची खबरदारी, पावसाळ्यात पूरस्थितीत अडकलेल्या नागरिकांना कशी मदत करावी, उंच इमारतींमध्ये आग लागल्यास लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याचे तंत्र याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

# कळमोंड्यात बिबट्याच्या हल्ल्यात दहा वर्षीय बालक ठार

### घाटघर परिसर हादरला | बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा व सीसीटीव्ही बसवण्याची ग्रामस्थांची मागणी

● **अकोले । वीरभूमी-**

घाटघर शिवारालगत कळमोंडा (ता. शहापूर) परिसरात दिवसाढवळ्या बिबट्याने केलेल्या रक्तरंजित हल्ल्यात दहा वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थ सध्या दहशतीच्या छायेत वावरत असून मोठी घबराट पसरली आहे.

घाटघरपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या कळमोंडा शिवारात ही घटना घडली. या घटनेनंतर घाटघर व आसपासच्या गावांमध्ये बिबट्याच्या दहशतीमुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीती निर्माण झाली असून, दिवसाढवळ्या देखील घराबाहेर पडण्यास ग्रामस्थ घाबरत आहेत.




या पार्श्वभूमीवर समाजसेवक अनंत महादू घाणे, तुकाराम खाडे, नरहरी इदे, चंदर गांगड, लक्ष्मण पोकळे, एकनाथ गांगड, अमृता झडे, जयराम इदे, भगवान झडे, सुभाष बांडे, पांडुरंग उघडे, एकनाथ सारुकते, रमेश खडके आदी घाटघर ग्रामस्थांनी वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित यांना निवेदन देत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली.

दिवसेंदिवस मनुष्यांवर वाढत चाललेल्या बिबट्यांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यावेळी झालेल्या चर्चेत परिसरात बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावणे तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, तसेच ग्रामस्थांमध्ये जनजागृती करून त्यांना आधार देण्याची गरजही यावेळी अधोरेखित करण्यात आली. ग्रामस्थांच्या मते, योग्य आणि तातडीची कार्यवाही केल्यास मानवी जीवितहानी टाळता येऊ शकते व निरागस बालकांचे जीव वाचवता येतील.

## संजय गायकवाड व बागेश्वर बाबांच्या वक्तव्यांवर मुख्यमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट करावी : माकप

● **अकोले । वीरभूमी-**

छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास जनतेसमोर आणणारे कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी पुस्तकाचे संपादक प्रशांत अंबी यांना अत्यंत वाईट पद्धतीने शिवीगाळ करत धमक्या दिल्या आहेत. माता-भगिनींबाबत त्यांनी वापरलेली भाषा कोणत्याही सभ्य व्यक्तीला सहन होणार नाही अशी आहे.

आमदार संजय गायकवाड व त्यांच्या पक्षाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला पाठिंबा आहे. त्यामुळे, आपल्या सरकारला पाठिंबा देणाऱ्या आमदाराच्या या वक्तव्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका काय आहे, हे त्यांनी स्पष्ट करावे, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.

एकीकडे ‘नारी वंदन’ची भाषा करायची आणि दुसरीकडे महिलांबाबत अशा प्रकारची आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्यांना पाठिंबा देत त्यांच्या कृतीकडे दुर्लक्ष करायचे, हा दुटप्पीपणा सोडण्याची गरज असल्याचेही पक्षाने म्हटले आहे.

दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत यांच्या उपस्थितीत कथावाचक बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त विधान केले. शिवाजी महाराज थकले होते आणि त्यांनी आपला राजमुकुट व राजसत्ता रामदास स्वामींसमोर ठेवली होती, असे इतिहासाची तोडमोड करणारे विधान त्यांनी केल्याचा आरोप आहे.

या विधानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मोहन भागवत यांचे समर्थन आहे का, असा प्रश्न मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने उपस्थित केला आहे. या प्रकरणातही त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, असे आवाहन पक्षाने केले आहे. तसेच, आमदार संजय गायकवाड आणि बागेश्वर बाबा या दोघांवरही कडक कारवाई करावी, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली असल्याची माहिती पक्षाचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी दिली.

## कन्हैया दूध उद्योग समूहाचे मच्छिंद्रशेठ लंके यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

● **निघोज । वीरभूमी-**

कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांचा वाढदिवस कन्हैया दूध उद्योग समूहाच्या सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध संस्था, संघटना आणि मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.



मळगंगा यात्रा समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी यात्रा समितीच्या वतीने, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे यांनी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद यांनी पत्रकार संघाच्या वतीने, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पारनेर तालुका उपाध्यक्षांनी आमदार काशिनाथ दाते यांच्या वतीने, रविशेठ लंके, पंढरीनाथ लंके, मयुर लंके यांनी साईबाबा अखंड हरिनाम सप्ताह मंडळाच्या वतीने, प्रगतशील शेतकरी पोपटराव लंके यांनी शेतकरी मित्र मंडळाच्या वतीने, मेजर वराळ यांनी पारनेर तालुका आजी-माजी सैनिक संघटनेच्या वतीने, तर उत्तमराव लामखडे यांनी रांजणगाव लघुउद्योग कामगार संघाच्या वतीने सत्कार केला.

या कार्यक्रमास मळगंगा यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, उपाध्यक्ष अर्जुन लामखडे, सचिव माऊली वरखडे, पदाधिकारी दिलीप ढवण, उत्तमराव लामखडे, संतोष ढवण, रमेश वरखडे, भास्करराव कवाद, विजय वराळ, कैलास कवाद, रवींद्र लंके, मयुर लंके, पंढरीनाथ लंके, पोपट लंके, राजेंद्र लामखडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिवाजीराव लंके म्हणाले की, कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शांताराम लंके यांनी प्रत्येक यात्रेसाठी मोठे योगदान दिले असून, त्याच परंपरेत मच्छिंद्रशेठ लंके यांनीही मार्गदर्शन व सहकार्य करून यात्रा समितीला बळ दिले आहे.

उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे म्हणाले की, निघोज व परिसरातील हजारो लोकांना रोजगार व व्यवसायाची संधी उपलब्ध करून देत कन्हैया दूध उद्योग समूहाने गावाच्या विकासात मोलाची भूमिका बजावली आहे.

मळगंगा यात्रा समितीचे उपाध्यक्ष अर्जुन लामखडे यांनी सांगितले की, मच्छिंद्रशेठ लंके यांनी युवा उद्योजक म्हणून राज्यात नावलौकिक मिळवला असून, त्यांच्या उद्योगविश्वातील संपर्कांचा फायदा भविष्यात स्थानिक युवकांना होणार आहे. युवकांच्या प्रगतीसाठी त्यांची भूमिका प्रेरणादायी आहे.

यावेळी सर्व मान्यवरांनी मच्छिंद्रशेठ लंके यांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भास्कर कवाद व रविशेठ लंके यांनी केले, तर शेवटी सोमनाथ वरखडे, विजय वराळ व दिलीप ढवण यांनी आभार मानले.

# उन्हाची काहिली आणि निसर्गाची हाक

एप्रिल महिन्यातील तापमान पाहता उन्हाची काहिली ना माणसांना सहन होईना, ना मुक्या प्राण्यांनाही सहन होईना. माणसाकडे अनेक पर्याय आहेत. पंखा, कुलर तसेच बंद घरामध्ये, ऑफिसमध्ये एसी लावून गारव्याला माणूस बसू शकतो. पण मुक्या प्राण्यांचे प्रचंड हाल होताना आपण पाहतो. घोटभर पाण्यासाठी त्यांना खूप भटकंती करावी लागते. कधी उघड्या गटारामधील पाण्यावर ते त्यांची तहान भागवतात, तर कधी काही प्राणीप्रेमींनी आपल्या कॉलनीमध्ये, घरासमोर या मुक्या जिवांचे पाण्यासाठी हाल होऊ नयेत म्हणून पाण्याची सोय केलेली पाहायला मिळते. झाडांची सावली तर खूप कमी प्रमाणातच पाहायला मिळते. शक्यतो जे वृक्षप्रेमी आहेत त्यांनी आपल्या घरासमोर झाड लावून त्याचे संगोपन केलेले अनेक ठिकाणी दिसते. त्यामुळे तरी पशुपक्षी, गायी, कुत्रे यांना त्याखाली सावली मिळते. आणि या झाडांमुळे ऑक्सिजनचे प्रमाण वाढून हवेतील प्रदूषण कमी होण्यास नक्कीच मदत होते.

हे सगळं ठीक आहे हो, पण शासनदरबारी लाखो रुपयांचा निधी मिळवून वृक्षारोपणाचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात कार्यक्रम घेतले जातात, असे आपण वर्तमानपत्रांमधील बातम्यांमधून पाहत असतो. आणि कुणी कुणी वृक्षारोपण केले, हे अशा बातम्यांच्या फोटोमधून देखील दिसते. मग जर दरवर्षी लाखो रुपयांच्या निधीतून शासकीय कार्यालयांकडून हे वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबवले जातात, तर मग ही लावलेली झाडे नेमकी कुठे लावली आहेत, हे सर्वसामान्य माणसाला पाहायला का मिळत नाही? हा प्रश्न प्रत्येक सर्वसामान्य व्यक्तीला नक्कीच भेडसावतो. शासनदरबारातून निधी लुटण्यासाठीच हा केवळ देखावा केला जातो का?





**सौ. आशा सुधीर साठे**

**सैनिकपत्नी, अहिल्यानगर**

**९६०४०५६९२८**

असे वृक्षारोपणाचे कार्यक्रम दाखवून खऱ्या अर्थाने एका दगडात दोन पक्षी मारले जातात असे दिसते. एकीकडे वृक्षारोपणासाठी आलेला खर्च दाखवून निधी उकळायचा आणि दुसरीकडे आम्ही पर्यावरण संरक्षणासाठी अनेक झाडे लावली असे दाखवून पर्यावरणासाठी काम केल्याचे भासवायचे आणि त्यासाठी पुरस्कारही मिळवायचे. नुसते एवढ्यावरच न थांबता शहरामध्ये महानगरपालिका दरवर्षी सर्वसामान्य जनतेकडून घरपट्टीद्वारे लाखो रुपयांचा वृक्षकर गोळा करत असते. घरपट्टीमध्ये ‘वृक्षकर’ नावाने स्वतंत्र कॉलम असतो आणि तो सर्वांकडून वसूल केला जातो. प्रत्येक ठिकाणी सर्वसामान्य जनतेलाच झळ बसत असते, हे नक्की.

प्रत्यक्षात कामे न करता शासकीय कार्यालयांमधील काही कर्मचारी कामचुकारपणा करताना दिसून येतातच, पण वेळप्रसंगी ज्या जनतेच्या कामासाठी ते पगार घेतात, त्याच जनतेवर अरेरावी करतानाही दिसतात. आपण त्यांना माहिती अधिकाराच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कामांची माहिती विचारू शकतो. पण असे अनेक कार्यकर्ते आहेत की ते माहिती अधिकार वापरून शासकीय कार्यालयांकडून माहिती मागवतात; मात्र त्यामध्ये विसंगती आढळल्यास त्या कार्यकर्त्यांमध्ये आणि संबंधित अधिकाऱ्यांमध्ये सेटलमेंट होऊन तो विषय जनतेपर्यंत येऊ न देता तिथेच थांबवला जातो. पाहा, अवघड आहे सगळंच.



जाता जाता एवढंच सांगेल-माणसा, तू तरी तुझ्या दारापुढे छोटंसं का होईना, एक तरी झाड लाव रे बाबा. ऑक्सिजनचे प्रमाण तर वाढेलच, पण पशुपक्ष्यांना निवारा मिळेल. तुझ्या अंगणात कमी प्रमाणात दिसणारी चिऊताई चिवचिव करत दाणे टिपण्यासाठी नक्कीच येईल.

सध्या प्रचंड तापमान वाढत आहे; सूर्यमामा आग ओकत आहे असंच वाटतंय. एसी, कुलर हे तात्पुरते गारव्याचे साधन आहे; परंतु झाडे लावली तर नुसते आपलेच नाही, तर पुढील कित्येक पिढ्यांसाठी ते कायमचे गारवा आणि ऑक्सिजन वाढवणारे साधन ठरेल. म्हणून विचार करा-नुसते वाचू नका, तर एक झाड लावून त्याचे शेवटपर्यंत संवर्धन करण्याची शपथ नक्की घ्या. आणि हो, मुक्या प्राण्यांसाठी प्रत्येकाने आपल्या घरापुढे त्यांच्या पाण्याची छोटीशी सोय जरूर करा.....

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## संघर्षावर मात करत उषाताई पवार यांचे एमपीएससीत यश

**● कोपरगाव । वीरभूमी –**

जिद्द, कष्ट आणि कुटुंबाच्या त्यागाच्या बळावर यशाची शिखरे सर करता येतात, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे शहरातील उषाताई पवार. पत्र्याच्या छोट्याशा घरात राहून, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेतलेल्या उषाताई यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करत तालुका पुरवठा अधिकारीपदी निवड मिळवली असून, त्यांच्या या यशाने कोपरगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. उषाताईंच्या यशामागे त्यांच्या कुटुंबाचा संघर्ष आणि त्यागाची हृदयस्पर्शी कहाणी दडलेली आहे. आईने झाडू काम करून संसाराचा गाडा ओढला, तर भाऊ ज्ञानेश्वर पवार यांनी अनेक वर्षे चप्पल-बूट शिवण्याचे व पॉलिश करण्याचे काम करत स्वतःच्या कष्टाच्या पैशातून बहिणीचे शिक्षण पूर्ण केले. परिस्थितीची झळ अंगावर घेत बहिणीच्या स्वप्नांना पंख देणारा हा आदर्शवत भाऊ आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे. गरीबी आडवी आली तरी स्वप्नांना खीळ बसू दिली नाही, हे उषाताई पवार यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सेवानिवृत्त अभियंता माधवराव पाटील व माजी नगराध्यक्ष मंगेश पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी उषाताईंच्या जिद्दीचे कौतुक करत, संघर्षातून उभे राहून मिळवलेले यशच समाजाला दिशा देणारे ठरते, अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या.

## शिर्डीत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत नागरिक निवेदन स्वीकृती उपक्रम

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांची थेट सोडवणूक करण्यासाठी शिर्डी येथे नागरिक निवेदन स्वीकृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत शिर्डी येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात हा उपक्रम पार पडणार असून नागरिकांना त्यांच्या विविध समस्या, अडचणी व मागण्यांबाबत लेखी निवेदने सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमाद्वारे महसूल, जमीन, पाणी, शासकीय सेवा व इतर प्रशासकीय विषयांशी संबंधित तक्रारी व मागण्या थेट मंत्रीस्तरावर मांडण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. नागरिकांनी आपली निवेदने लेखी स्वरूपात सादर करावीत, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## सुरेखा मुळे यांचे निधन

**● पाथर्डी । वीरभूमी–**



तालुक्यातील घाटशिरस येथील वेदशास्त्र संपन्न सुरेशदेवा मुळे यांच्या सुविद्य पत्नी सुरेखा सुरेश मुळे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे मागे पती, मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. वृद्धेश्वर देवस्थानचे ज्येष्ठ पुरोहित सुनीलदेवा मुळे यांच्या त्या भावजई होत. अत्यंत धार्मिक वृत्तीच्या म्हणून त्यांची पंचक्रोशीत ओळख होती. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# घोड धरणावरून साकळाई योजनेला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

### महामार्गावर मढेवडगाव येथे रस्ता रोको आंदोलन । निर्णय मागे न घेतल्यास तीव्र लढ्याचा इशारा

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

घोड धरणावरून प्रस्तावित साकळाई पाणीपुरवठा योजनेविरोधात घोड लाभक्षेत्रातील शेतकरी आक्रमक झाले असून शनिवार दि.२५ रोजी सकाळी मढेवडगाव येथे नगर-दौंड राष्ट्रीय महामार्गावर जोरदार रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.




आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधले. आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. साकळाई योजना घोड धरणावर न राबवता सांडव्याद्वारे वाहून जाणाऱ्या पाण्यावर राबवावी, अन्यथा तीव्र लढा उभारला जाईल, असा इशारा स्मितल वाबळे यांनी दिला. टिळक भोस यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना म्हटले, साकळाई योजनेचे पाप विद्यमान आमदार, खासदार आणि पालकमंत्र्यांचे आहे. जर त्यांच्यात हिंमत असेल, तर पुणे जिल्ह्यात अडवलेले आमचे हक्काचे पाणी घोड धरणात आणून दाखवावे. शेतकऱ्यांनी मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये घोड धरण हे जुने व मातीचे असल्याने त्यावर अतिरिक्त ताण टाकू नये, कुकडी प्रकल्पातून डिंभे- माणिकडोह बोगद्यातून वाहून जाणारे हक्काचे पाणी प्रथम मिळावे, तसेच सध्याच्या पाणीटंचाईमुळे तिसरे आवर्तन शक्य नसल्याने साकळाई योजना विसापूर धरणावरून राबवावी, यांचा समावेश होता.

विसापूर धरणाची क्षमता वाढविणे शक्य असल्याने हा पर्याय अधिक व्यवहार्य व आर्थिकदृष्ट्या योग्य असल्याचेही शेतकऱ्यांनी नमूद केले. यावेळी सह्याद्री घाटातून कोकणात वाहून जाणारे पाणी अडवून ते कुकडी प्रकल्पात वळविण्याची पर्यायी योजना राबवण्याची मागणीही करण्यात आली.

या आंदोलनात मढेवडगावचे सरपंच प्रमोद शिंदे, श्रीनिवास घाडगे, तुळशीराम रायकर, रामभाऊ रायकर, सुभाष शिंदे, राजेंद्र निळकंठ नागवडे, राहुल जंगले, बापूसाहेब भुजबळ, महेश सूर्यवंशी, राहुल साळवे, अंबादास मांडे, अजय वाबळे, निळकंठ जंगले, गोरख उंडे आदींनी मनोगते व्यक्त करत शासनाच्या भूमिकेवर तीव्र टीका केली. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

मोठ्या पोलीस बंदोबस्तात आंदोलन पार पडले. यावेळी शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन घोड विभागाचे उपअभियंता मारुती ठणके यांना देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश मांडे यांनी केले.

दरम्यान, घोड धरणावरून साकळाई योजना राबविण्याचा निर्णय तात्काळ मागे घेतला नाही, तर येत्या काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला आहे.

## इंदोरीच्या ललित नवले यांना भाभा संस्थेत सुवर्णपदक

**● अकोले । वीरभूमी–**




शेतीत कष्ट करत पारंपरिक चौकटीबाहेर जाऊन आधुनिक शिक्षणाची वाट निवडणाऱ्या इंदोरी येथील नवले कुटुंबातील ललित अच्युत नवले यांनी होमी भाभा नॅशनल युनिव्हर्सिटीमधून न्यूक्लिअर मेडिसिन विषयात पदव्युत्तर पदवी संपादन करत विशेष सुवर्णपदक मिळवले आहे. संशोधनप्रधान असलेल्या या अभ्यासक्रमात यश मिळवत त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर नवा आदर्श निर्माण केला आहे.

डॉ. होमी भाभा अनुसंधान केंद्र, मुंबई येथे नुकताच पदवीदान सोहळा अणुशक्तीनगर येथे पार पडला. या सोहळ्यास भारत सरकारच्या नीती आयोगाचे सदस्य डॉ. विनोद कुमार पॉल, परमाणु ऊर्जा विभागाचे सचिव डॉ. अजित कुमार मोहंती, होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूटचे कुलपती प्रा. यू. कामाची मुदाली तसेच डीन प्रा. ए. के. त्यागी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ललित नवले यांना न्यूक्लिअर मेडिसिन व मॉलिक्युलर इमेजिंग या संशोधनात्मक पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विशेष सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

विशेष म्हणजे, देशपातळीवर या कार्यक्रमात महाराष्ट्रातील केवळ दोन विद्यार्थ्यांनाच हे सुवर्णपदक मिळाले असून त्यात ललित नवले यांचा समावेश आहे.

ललित नवले यांना टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक प्रा. एस. गुप्ता, टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे संचालक प्रा. सी. एम. प्रमेश, अकॅडमी डायरेक्टर प्रा. एस. लष्कर, प्रा. एस. कुलकर्णी, विभाग प्रमुख प्रा. डॉ. व्ही. रंगराजन, प्रा. भक्ती शेटे, प्रा. डॉ. आशिष झा आणि प्रा. डॉ. स्नेहा मिथुन यांचे मार्गदर्शन लाभले.

## घोगरगाव पोलीस पाटील प्रकरण तापले : बडतर्फीची मागणी, कसुरी अहवालानंतर कारवाईकडे लक्ष

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा तालुक्यातील महत्वाचे गाव असलेल्या घोगरगाव येथील पोलीस पाटील सुदाम माणिक बोरुडे यांच्याविरोधात गंभीर आरोप समोर आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रशांत शिवाजी भोस यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज दाखल करून बोरुडे यांना तात्काळ पदावरून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे.

> पोलीस पाटील हे गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी महत्त्वाचे पद आहे. मात्र, जेव्हा स्वतः त्या पदावरील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय गुन्हेगारी प्रवृत्तीत गुंतलेले असतात, तेव्हा नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास डळमळीत होतो. त्यामुळे महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियमातील तरतुदीनुसार सुदाम बोरुडे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना तात्काळ पदावरून बडतर्फ करावे.
>
> – **प्रशांत भोस,** तक्रारदार

तक्रारी अर्जात प्रशांत भोस यांनी म्हटले आहे की पोलीस पाटील बोरुडे यांचे वर्तन तसेच त्यांच्या कुटुंबीयांची कृत्ये ही पदाला न शोभणारी व कायद्याला आव्हान देणारी आहेत. विशेषतः त्यांच्या मुलगा सागर बोरुडे याच्यावर महसूल प्रशासनावर हल्ला केल्याचा गंभीर आरोप असून, सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय, लिंबू व्यापाऱ्यांवर हल्ला केल्याच्या घटनेतही संबंधितावर कारवाई झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच घरगुती हिंसाचाराच्या प्रकरणात सागर बोरुडे यांच्या पत्नीने दाखल केलेल्या गुन्ह्यात स्वतः पोलीस पाटील सुदाम बोरुडे यांचाही समावेश असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, या सर्व प्रकरणांची दखल घेत श्रीगोंदा पोलीस ठाण्याकडून 'कसुरी अहवाल' सादर करण्यात आला आहे. श्रीगोंदा तहसीलदार यांनी १७ एप्रिल २०२६ रोजी श्रीगोंदा-पारनेरचे उपविभागीय अधिकारी यांना पाठविलेल्या अहवालात पोलीस पाटील बोरुडे हे शासकीय कामकाजात सहकार्य करत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे व तहसील कार्यालयाच्या चौकशी अहवालानुसार, बोरुडे हे अपघात, मयत किंवा गुन्हेगारी घटनांची माहिती वेळेवर देत नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. तसेच त्यांच्या कामात सचोटी नसल्याची नोंद पोलीस प्रशासनाने केली आहे.

याशिवाय महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर हल्ला केल्याप्रकरणी त्यांच्या मुलाविरुद्ध गुन्हा दाखल असल्याचेही अहवालात नमूद आहे. यासंदर्भात कसुरी अहवाल, एफआयआरच्या प्रती तसेच तहसील कार्यालयाचा अहवालही तक्रार अर्जात जोडण्यात आला आहे. सध्या या प्रकरणामुळे घोगरगावमध्ये तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाकडून निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी होऊन योग्य ती कारवाई होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# कांदा पिकावरील बुरशीजन्य रोगांवर 'शाश्वत' उपाय; राणी शेख यांना पुणे विद्यापीठाची पीएचडी

### वनस्पती अर्क, गोमूत्र व ताकाच्या वापरातून प्रभावी नियंत्रण सिद्ध । शाश्वत शेतीसाठी उपयुक्त संशोधन

**● पारनेर । वीरभूमी –**

कांदा हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे नगदी पीक असले तरी त्यावरील बुरशीजन्य रोगांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. या समस्येवर प्रभावी आणि पर्यावरणपूरक उपाय शोधण्यासाठी पारनेर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थिनी राणी शेख यांनी महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे. त्यांच्या या कार्याबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यांना पीएचडी (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान केली आहे.

डॉ. राणी शेख यांनी 'कांदा पिकावरील विविध बुरशीजन्य रोग व त्यांचे नियंत्रण' हा विषय संशोधनासाठी निवडला होता. रासायनिक कीटकनाशकांच्या वापरामुळे जमिनीचा पोत बिघडत असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी नैसर्गिक घटकांवर आधारित प्रयोगांना प्राधान्य दिले. विविध वनस्पतींच्या पानांचा अर्क, गायीचे गोमूत्र आणि ताक यांचा वापर करून प्रयोगशाळेच्या स्तरावर बुरशीजन्य रोगांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते, हे त्यांनी आपल्या प्रबंधातून सिद्ध केले आहे. त्यांचे हे संशोधन भविष्यात विषमुक्त आणि शाश्वत शेतीसाठी दिशादर्शक ठरणार आहे.

हे संशोधन पूर्ण करताना त्यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठ (राहुरी) तसेच कांदा व लसूण संशोधन केंद्र (राजगुरुनगर) यांचे तांत्रिक सहकार्य लाभले. त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्येही प्रसिद्ध झाले आहेत. डॉ. शेख यांनी यापूर्वी वनस्पतीशास्त्र विषयात SET आणि GATE या स्पर्धा परीक्षाही उत्तीर्ण केल्या आहेत.

या संशोधनासाठी त्यांना न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे आणि खजिनदार अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे यांनी अभिनंदन केले आहे.



तसेच संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त माजी आमदार नंदकुमार झावरे, सीताराम खिलारी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, आयक्यूएसी (IQAC) समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. दिलीप ठुबे आणि वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र देशमुख यांच्यासह सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी डॉ. राणी शेख यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. त्यांच्या या संशोधनामुळे शेतकरी वर्गातूनही समाधान व्यक्त केले जात आहे.

# अहिल्यानगरात ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रेचे जल्लोषात स्वागत

## जलसंवर्धनाचा संदेश देत उत्साहात आगमन । मान्यवरांची उपस्थिती, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद









**● अहिल्यानगर । वीरभूमी –** ‘गोदा ते नर्मदा – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रा २०२६’ चे आज सायंकाळी ६ वाजता अहिल्यानगर शहरात उत्साहात आगमन झाले. शहरात ठिकठिकाणी नागरिकांनी जलयात्रेचे जंगी स्वागत करत जलसंवर्धनाच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शहरात या जलयात्रेचे आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी महायुतीतील विविध नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आल्यानंतर माळीवाडा मार्गे पायी चालत जलयात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याकडे पुढे सरकली.

विशाल गणपती येथे डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पारंपरिक कलशासह आरती करण्यात आली. यावेळी वारकरी संप्रदायातील भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला, तर महिलांनी फुगडी खेळत पारंपरिक वातावरणाची रंगत वाढवली.

यावेळी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रा हा जनजागृती आणि प्रेरणेचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या यात्रेद्वारे जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापनाबाबत अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवला जात आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच गिरीश महाजन यांच्या पुढाकारातून जन्मभूमी चौंडी ते कर्मभूमी महेश्वर असा या यात्रेचा प्रवास आखण्यात आला आहे. पाण्याचे महत्त्व, जलसंधारणाची गरज आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीचा संदेश या यात्रेद्वारे दिला जात आहे.

दरम्यान, या जलयात्रेचा भव्य शुभारंभ श्री क्षेत्र चौंडी येथे पार पडला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तसेच विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत या उपक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळ व समाधीस्थळाला अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांनी जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत, पुढील तीन वर्षांत अहिल्यानगर जिल्ह्यातील एकही जलसंपदा प्रकल्प प्रलंबित राहणार नाही, असा निर्धार व्यक्त केला.

ही जलयात्रा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक उपक्रम नसून जलसंवर्धनाबाबत जनजागृती घडवणारा आणि भविष्यासाठी पाणी सुरक्षित करण्याचा महत्त्वपूर्ण संकल्प असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या कार्यक्रमाला खासदार रामराव वडकुते, आमदार अमोल खताळ, आमदार काशिनाथ दाते तसेच संत-महंत, वारकरी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. याशिवाय ग्रामस्थ, महिला भगिनी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित राहून या जलयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## एनएमएमएस परीक्षेत मढेवडगावच्या न्यू इंग्लिश स्कूलचे दणदणीत यश; नऊ विद्यार्थी गुणवत्ता यादीत



**● श्रीगोंदा । वीरभूमी –** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव विद्यालयाने दणदणीत यश संपादन करत तालुक्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. विद्यालयातील तब्बल नऊ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले असून ग्रामीण भागातील ही कामगिरी विशेष लक्षवेधी ठरली आहे.

२८ डिसेंबर २०२६ रोजी झालेल्या या स्पर्धा परीक्षेत अक्षदा भानुदास बनकर, समृद्धी मुकेश मांडे, सार्थक भाऊसाहेब मांडे, आदित्य सुरेश पवार, सार्थक मारुती पारखे, रिद्धी योगेश चाकणे, श्रुती अविनाश शिंदे, श्रेया रविंद्र पवार आणि सुमेध अमोल ठोकळे या विद्यार्थ्यांनी यश संपादन करत शिष्यवृत्ती मिळवली आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांना नववी ते बारावीपर्यंत दरवर्षी १२ हजार रुपये प्रमाणे एकूण ४८ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. परिणामी, या नऊ विद्यार्थ्यांना मिळून एकूण ४ लाख ३२ हजार रुपयांचा शिष्यवृत्ती लाभ मिळणार आहे.

सातत्यपूर्ण नियोजन, कठोर सराव आणि शिक्षकांचे गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाल्याचे मानले जात आहे. या परीक्षेसाठी महादेवी माने (बुद्धिमत्ता), राजेंद्र शेळके (समाजशास्त्र), प्रणव नलगे (गणित), लक्ष्मी बोलणे व विशाखा साळवे (विज्ञान) तसेच विकास चव्हाण या शिक्षकांचे विशेष मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक हौसराव दांगडे आणि पर्यवेक्षक विलास सुलाखे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय चेअरमन आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप, जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस, सल्लागार समिती सदस्य स्मितल वाबळे, देणगीदार रवींद्रराव महाडिक, सरपंच प्रमोद शिंदे तसेच स्थानिक स्कूल कमिटी, ग्रामपंचायत सदस्य, सेवा संस्था प्रतिनिधी, पालक आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या यशामुळे विद्यालयाचा शैक्षणिक लौकिक अधिक वृद्धिंगत झाला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# आ. आशुतोष काळेंच्या नेतृत्वाखाली रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाची गुणवत्तेत भव्य झेप

## आमदार आशुतोष काळेंकडून व्यवस्थापन व शिक्षकांचे अभिनंदन

**● कोपरगाव । वीरभूमी –** रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक शैक्षणिक निर्णयातून गुणवत्ता आणि संधी यांचा संगम घडून आला असून राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेच्या सन २०२५-२६ च्या निकालात रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाने अभूतपूर्व यश संपादन केले आहे. या परीक्षेत तब्बल ४३९ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून, सर्वसामान्य कुटुंबातील या गुणवंत विद्यार्थ्यांच्या भविष्याला सोनेरी पंख बहाल करून उत्तर विभागाने राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

### विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी प्रयत्न

■ रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाने मिळविलेल्या या यशामागे संस्थेचे पदाधिकारी, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक, मार्गदर्शक, विद्यार्थी आणि पालक यांचे सामूहिक प्रयत्न असले तरी या सर्व घटकांना दिशा देणारे उत्तर विभागाचे अध्यक्ष आ. आशुतोष काळे यांची भूमिका अतिशय मोलाची आहे. त्यामुळे यापुढील काळातही यश मिळविण्यात आघाडीवर असलेला उत्तर विभाग आ. आशुतोष काळे यांच्या नेतृत्वाखाली अशाच वेगाने सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार यात शंका नाही.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आदर्श विचारांवर वाटचाल करतांना स्व.कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी ज्याप्रमाणे रयत शिक्षण संस्थेच्या हिताला प्राधान्य देवून निःस्वार्थ भावनेतून रयत शिक्षण संस्थेला खऱ्या अर्थाने प्रगतीच्या शिखरावर नेवून ठेवले. तोच वसा आणि वारसा पुढे चालवितांना उत्तर विभागाची जबाबदारी समर्थपणे पार पाडतांना आमदार आशुतोष काळे यांनी सहा वर्षात उज्वल कामगिरी केली आहे. त्यांनी उत्तर विभागात गुणवत्ता विकास कार्यक्रम राबवून शिक्षणाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणले. विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी नियोजनबद्ध उपक्रमांची अंमलबजावणी केली. त्यामुळे उत्तर विभागाच्या अहिल्यानगर जिल्हा ३१७ विद्यार्थी, नाशिक जिल्हा ११८ विद्यार्थी आणि बीड जिल्ह्यातील ०४ विद्यार्थी अशा एकूण ४३९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला.

यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचे स्वतंत्र गुणवर्ग तयार करून स्पर्धा परीक्षांसाठी अतिरिक्त तासांची व्यवस्था करण्यात आली. विषयानुसार सराव परीक्षा आणि नियमित चाचण्या घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येवून पालकांशी सातत्यपूर्ण संवाद साधण्यात आला. या सर्व उपक्रमांमुळे ग्रामीण व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवण्याचा आत्मविश्वास मिळवून देण्यात उत्तर विभाग यशस्वी झाला आहे. त्यामुळे सक्षम नेतृत्व, योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही यशाच्या शिखरावर सहजपणे पोहोचवता येते हे रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. गेल्या पाच वर्षांत उत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी तब्बल १० कोटी ३५ लाख ८४ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली असून त्यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळून विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाची वाट अधिक सुलभ होण्यास मदत झाली आहे.

# सुजित झावरे पाटील यांच्या प्रयत्नातून ढवळे-वराळ वस्तीचा अंधार दूर

## नवीन डीपी बसवून वीजप्रश्न मार्गी । निघोज ग्रामस्थांकडून नागरी सत्कार



**● निघोज । वीरभूमी–** पारनेर तालुक्यातील निघोज येथील ढवळे व वराळ वस्तीवर गेल्या अनेक वर्षांपासून विजेच्या अभावामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. या समस्येमुळे वस्तीवरील ग्रामस्थ हैराण झाले होते. काही दिवसांपूर्वी ग्रामस्थांनी सुजित झावरे पाटील यांची भेट घेऊन नवीन डीपी (रोहित्र) बसवण्याची मागणी केली होती. या मागणीला अखेर यश आले असून, नव्याने बसवण्यात आलेल्या डीपीचे लोकार्पण नुकतेच पार पडले.

या कामासाठी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे संघटक तथा ग्रामपंचायत सदस्य मंगेश वराळ, युवा नेतृत्व पै. सुभाष वराळ, पै. रावसाहेब वराळ आणि पै. विलास वराळ यांनी विशेष पाठपुरावा केला.

लोकार्पण सोहळ्याप्रसंगी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रमेश अण्णा ढवळे, राजू भिकाजी ढवळे, गौतम गणपत ढवळे, महेश भाऊ ढवळे, श्रीराम दत्तात्रय ढवळे, भास्कर दत्तात्रय ढवळे, नवनाथ शांताराम ढवळे, सतीश नामदेव ढवळे, बबन रामचंद्र ढवळे, रघुनाथ रामचंद्र ढवळे, सदाशिव कोंडीबा ढवळे, सागर ज्ञानदेव ढवळे, सुनील प्रकाश ढवळे, आदित्य सतीश ढवळे, तुषार रघुनाथ ढवळे, सिद्धार्थ सदाशिव ढवळे, समीर बबन ढवळे, सुखदेव रामचंद्र ढवळे, रमेश सुखदेव ढवळे, वैभव रामदास भोसले, अतुल रामदास भोसले, किसन नामदेव थोरात, साहिल गौतम ढवळे, नितीन भिकाजी ढवळे, चंद्रकांत बाळू ढवळे, वत्सला शिवाजी ढवळे, अनिता प्रकाश ढवळे, बबिता बबन ढवळे, तन्मय संदीप ढवळे, कार्तिक नितीन ढवळे, सागर शिवाजी ढवळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

तसेच माजी सरपंच ठकारामशेठ लंके, शिवसेना महिला आघाडी प्रमुख सौ. कोमल भंडारी, उपतालुकाप्रमुख देवराम लामखडे, शेतकरी सेना तालुकाप्रमुख महेंद्र पांढरकर, शहाजी कवडे, पै. लहू निचित, हर्षद इधाटे, स्वप्निल आतकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील म्हणाले की, महायुती सरकारच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे हाती घेतली आहेत. पारनेर तालुक्याच्या विकासासाठीही मोठा निधी उपलब्ध झाला असून, बहुतांश कामे लवकरच पूर्णत्वास जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, वस्तीवरील दीर्घकालीन वीजप्रश्न मार्गी लागल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत सुजित झावरे पाटील यांचा नागरिक सत्कार केला.